**धर्मादाय आयुक्त, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांचे कार्यालय**

**२ रा मजला, सास्मिरा इमारत सास्मिरा मार्ग, वरळी मुंबई ४०० ०३०**

**सेवा करार पध्दतीने विवक्षीत कामांसाठी सेवानिवृत्त अधिकारी यांना कंत्राटी पध्दतीवर नेमणूक करण्याबाबत जाहिरात**

महाराष्ट्र शासन सामान्य प्रशासन विभाग शासन निर्णय क्र. संकीर्ण २७१५/प्र.क्र.१००/१३ मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक मंत्रालय मुंबई ४०००३२ दिनांक १७/१२/२०१६ अनुसार दिलेल्या निर्देशानुसार लघुलेखक (उ.श्रे)/लघुलेखक (क.श्रे) या संवर्गातील सेवानिवृत्त अधिकारी यांची कंत्राटी पध्दतीवर धर्मादाय संघटनेत खालील तक्त्यामध्ये नमूद केलेल्या जिल्हा/कार्यालय या ठिकाणी विवक्षीत कामासाठी (श्रृतलेखन व टंकलेखन) यांची नेमणूक करावयाची आहे.

| क्र. | पदाचे नाव | पदसंख्या | जिल्हा/कार्यालय | अनुभव |
|---|---|---|---|---|
| १ | लघुलेखक (उ.श्रे) | ०१ | मुंबई | स्वीय सहायक /समकक्ष पदावर तीन वर्षाचा अनुभव तीन वर्षाचा अनुभव किंवा स्वीय सहायक, लधुलेखक(उ.श्रे) उपलब्ध न झाल्यास लघुलेखक (क.श्रे) पदावर तीन वर्षाचा अनुभव असलेल्या उमेदवाराचा विचार करण्यात येईल. |
| २ | लघुलेखक (क.श्रे) | ०३ | मुंबई,ठाणे,पुणे | लघुलेखक (उ.श्रे) किंवा समकक्ष पदावर तीन वर्षाचा अनुभव |

शासकीय कार्यालयात/न्यायालयात/धर्मादाय संघटनेत लघुलेखनाचे कामकाज केलेले सेवानिवृत्त अधिकारी यांची नेमणूक कंत्राटी पध्दतीने एक वर्षासाठी करावयाची आहे. धर्मादाय संघटनेतील स्वीय सहायक, लघुलेखक (उ.श्रे)/लघुलेखक (क.श्रे) या संवर्गातील सेवानिवृत्त झालेले अधिकारी यांना प्राधान्य देण्यात येईल. सेवानिवृत्त अधिकारी यांना श्रृतलेखनाचे ज्ञान व पुरेसा अनुभव असणे आवश्यक आहे. इच्छुक अर्जदारांनी विहीत नमुन्यातील अर्ज धर्मादाय आयुक्त, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांच्याकडे दि. **२५.०७.२०२४** रोजी सायंकाळी **५:००** वाजेपर्यंत प्राप्त होईल याप्रमाणे टपालाव्दारे किंवा प्रत्यक्ष सादर करावीत. अर्जाचे पाकीटावर "सेवानिवृत्त अधिकारी यांच्या कंत्राटी पध्दतीवर नेमणूक करण्याबाबत" असे स्पष्ट लिहुन ज्या पदासाठी अर्ज सादर केला आहे. त्या पदाचे नाव लिहिण्यात यावे. तसेच अर्जासोबत आपले नाव व संपुर्ण पत्ता असलेले (१७ X १० से.मि. आकाराची) दोन (२) रिकामे पाकीटावर रुपये ४०/- इतके रकमेचे पोस्ट तिकीट चिटकवून अर्जासोबत सादर करावीत. उपरोक्त दिनांकानंतर प्राप्त झालेल्या अर्जाचा व अपुर्ण असलेल्या अर्जाचा विचार करण्यात येणार नाही. सदर नेमणूका सल्लागार समिती मार्फत पात्र उमेदवारांच्या मुलाखतीव्दारे करण्यात येतील.

**सही**
अमोघ श्या. कलोती
धर्मादाय आयुक्त
महाराष्ट्र राज्य,मुंबई

D:\लघुलेखक उ.श्रे., क.श्रे. जाहिरात मसुदा\जाहिरात 1.7.24.docx

**सदर नेमणूका ह्या खालील सर्वसाधारण शर्ती व अटीच्या अधिन राहतील**

१. अर्ज करणाऱ्या सेवानिवृत्त अधिकाऱ्याने ज्या पदासाठी अर्ज केला आहे. त्या पदाच्या विवक्षीत कामासाठी लागणारी विशेष अर्हता व किमान तीन वर्षाचा अनुभव असणे आवश्यक आहे.

२. सदर नेमणूका ह्या एक वर्षाच्या कालावधीसाठी आहेत. एक वर्षापेक्षा जास्त कालावधी वाढविण्याची आवश्यकता भासल्यास नियुक्ती अधिकारी शासन मान्यतेने तसा निर्णय घेऊ शकतात.

३. नियुक्त अर्जदाराला त्यांनी विहीत कार्यपालन केल्यामुळे महाराष्ट्र शासन सामान्य प्रशासन विभाग, शासन निर्णय क्र.संकीर्ण-२७१५/प्र.क्र.१००/१३ मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक मंत्रालय मुंबई ४०००३२ दिनांक १७.१२.२०१६ मधील अटी व शर्तीप्रमाणे, तसेच सामान्य प्रशासन विभाग यांचे दि.०८.०९.२०२३ रोजीच्या शासन निर्णयानुसार व शासनाने वेळोवेळी निर्गमित केलेल्या शासन निर्णयानुसार मासिक परिश्रमीक त्यांना अनुज्ञेय राहील.

४. करारपध्दतीने नियुक्ती देण्यात आल्यामुळे संबंधीतास शासनाच्या कोणत्याही विभागात/संवर्गात सेवा समावेशनाबाबत किंवा सामावून घेण्याबाबत वा नियमित सेवेचा इतर कोणतेही लाभ मिळण्याचा अधिकार/हक्क नसेल याबाबत अर्जदाराने रु.१००/- च्या स्टॅम्पवर प्रतिज्ञालेख देणे बंधनकारक राहील.

५. करारपध्दतीवर नियुक्ती करण्यात येणाऱ्या व्यक्ती त्यांच्या वयाच्या ६५ व्या वर्षापर्यंतच पदावर कार्यरत राहू शकतील.

६. अर्ज करणाऱ्या सेवानिवृत्त व्यक्ती यांनी त्यांची शारीरीक, मानसिक वा आरोग्याच्या दृष्टीने सक्षम असल्याबाबतचे, स्वयंघोषणापत्र सादर करणे बंधनकारक राहील.

७. करार पधदतीने नियुक्त झालेल्या अर्जदारास नेमूणक दिलेली कामे पूर्ण करण्याची जबाबदारी संबंधीत व्यक्तीची राहील व तसे बंधपत्र / हमीपत्र अटी व शर्ती संबंधीत उमेदवाराला मान्य आहेत ह्याबाबतचे उमेदवाराने रु.१००/- च्या स्टॅम्पपेपरवर बंधपत्र देणे बंधनकारक राहील.

८. अर्ज करणाऱ्या सेवानिवृत्त व्यक्ती विरुध्द कोणत्याही प्रकारची विभागीय चौकशी व न्यायालयीन प्रकरण चालु अथवा प्रलंबीत नसावे. याबाबत अर्जदारांनी ज्या कार्यालयातुन सेवानिवृत्त झाले आहे, त्या संबंधीत कार्यालयाकडून तसे प्रमाणपत्र देणे बंधणकारक राहील.

९. नियुक्ती प्राधिकारी यांना कोणत्याही वेळी करार पध्दतीवरील सेवा समाप्त करण्याचे अधिकार राहतील.

१०. करार पध्दतीने नियुक्त करण्यात आलेली व्यक्ती, सोपविलेल्या सेवा पार पाडण्याच्या कामात व्यत्यय निर्माण होईल अशा कोणत्याही कामात गुतलेला नसावा. करार पध्दतीने नियुक्ती करण्यात आलेल्या व्यक्तीने गुंतलेले हितसंबध (Conflict of interest) जाहीर करणे आवश्यक राहील.

११. करार पध्दतीने नियुक्त झालेल्या व्यक्ती यांना आवश्यक प्रसंगी दौरा करावा लागल्यास त्यांना त्यांच्या निवृत्तीच्या वेळच्या वेतमानास अनुसरुन प्रवास भत्ता व दैनिक भत्ता अनुज्ञेय राहील.

१२. करार पध्दतीवरील व्यक्ती यांनी त्यांना प्राप्त होणाऱ्या कागदपत्रे / माहिती, कामाबाबत व आधारसामुग्री बाबत गोपनीयता पाळणे बंधणकारक राहील.

१३. करार पध्दतीवरील नियुक्ती व्यक्तींनी त्यांच्यावर सोपविलेले कामकाज निश्चित केलेल्या कालावधीत पुर्ण करणे आवश्यक राहील. करार पध्दतीने नियुक्त झालेल्या व्यक्तीस नेमून दिलेले काम समाधानकारक नसल्यास कोणतेही सबळ कारण न देता त्यांची सेवा समाप्त करण्यात येईल.

१४. कार्यालयाच्या कामकाजाच्या आवश्यकतेनुसार करार पध्दतीने नियुक्त झालेल्या व्यक्ती यांना नेमून दिलेले कार्यालय/जिल्हा यामध्ये बदल करण्याचे अधिकार नियुक्ती प्राधिकारी यांना राहतील.

१५. प्राप्त झालेले अर्ज कोणतेही कारण न देता नाकारण्याचे तसेच प्रक्रिया थांबविण्याचे किंवा रद्द करण्याचे अधिकार राखुन ठेवण्यात येत आहे. आवश्यकतेनुसार जाहीरातीतील नमुद केलेली पदे कमी/अधिक होऊ शकेल.

सही
अमोघ श्या. कलोती
धर्मादाय आयुक्त
महाराष्ट्र राज्य,मुंबई

# विहित नमुन्यातील अर्ज

धर्मादाय संघटनेतील सेवा करार पध्दतीने विवक्षीत कामासाठी सेवानिवृत्त स्वीय सहायक, लघुलेखक (उ.श्रे)/लघुलेखक (क.श्रे) यांची नेमणूक करार पध्दतीने घेणेबाबतचा अर्ज

प्रति,

मा. धर्मादाय आयुक्त
महाराष्ट्र राज्य,मुंबई
२ रा मजला, सास्मिरा इमारत
सास्मिरा मार्ग, वरळी
मुंबई ४०० ०३०

फोटो

अर्ज केलेल्या पदाचे नाव ------------------------------

व काम करण्यास इच्छुक ठिकाण --------------------------------

१. अर्जदाराचे नाव -
२. कायमचा पत्ता -
३. दूरध्वनी क्रमांक -
/भ्रमणध्वनी सह (अनिवार्य) -
४. ई-मेल (अनिवार्य) -
५. सध्याचा पत्ता -
६. जन्मतारीख -
७. राष्ट्रीयत्व -
८. प्रवर्ग -
९. लिंग - पुरुष/महिला
१०. अवगत भाषा -
११. शैक्षणिक माहिती - पदवी/पदविका/इतर.
१२. अनुभव

| अ.क्र. | हुद्दा व वेतन | कार्यालयाचे नाव व पत्ता | कालावधी | कामाचा अनुभव (विस्तृत स्वरुपात) |
|---|---|---|---|---|
| १. | | | | |
| २. | | | | |
| ३. | | | | |

१३. सेवानिवृत्तीचा दिनांक –
१४. सेवानिवृत्त ज्या कार्यालयातून झाले त्या कार्यालयाचे नाव व सेवानिवृत्तीचे पद -
१५. सद्यःस्थितीत कुठे काम करीत असल्यास तपशिल –

(वर नमूद तपशिलाबाबत आवश्यक ते पुरावे स्वसाक्षांकित करुन अर्जासोबत जोडावे.)

अर्जदाराचे संपूर्ण नाव व सही

कृ.मा.प.

### प्रतिज्ञापत्र

मी, ---------------------------- प्रतिज्ञापत्र लिहून देता/देते की, आपण प्रसिध्द केलेल्या जाहिरातीमधील नमूद केलेल्या शासन निर्णयातील अटी व शर्तीचे वाचन केले असून ते मला पूर्णपणे मान्य आहे.

स्वाक्षरी

ठिकाणः-

दिनांक :-